दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३०६ ■ शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रुपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -306 ■ Friday, 28 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## अखेर मुसक्या आवळल्या, स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडेला पुणे पोलिसांनी केली अटक

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानकातील शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर मंगळवारी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास बलात्कारची घटना घडली होती.या आरोपीचा शोध १३ पथकांच्या म ाध्यमांतून घेतला जात होता,पण अखेर या आरोपीला गुणाट या गावातून पोलिसांनी अटक केली आहे.

मंगळवारी पहाटे साडे पाच वाजण्याच्या सुमारास २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याच्या घटनेच्या निषेधार्थ अनेक संघटनाकडून स्वारगेट एसटी स्थानकात आंदोलन केली.या घटनेच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी १३ ठिकाणी पथक रवाना केली होती.तसेच आरोपीचा तांत्रिकदृष्ट्या विश्लेषणाद्वारे देखील शोधा घेतला जात होता.तर आरोपीने मागील दिवसात ज्या ज्या व्यक्तीना फोन केले होते.

त्या सर्व व्यक्तींकडे पोलिसांमार्फत चौकशी केली जात होती.त्याच दरम्यान आरोपी दत्तात्रय गाडे या आरोपीला शोधून देर्णाया नागरिकाला पुणे पोलिसांनी एक लाख रूपयांचे बक्षीस देखील जाहीर केले होते.तर आरोपी दत्तात्रय गाडे हा मूळचा शिरुर तालुक्यातील गुणाट या गावातील आहे.त्या पार्श्वभूमीवर आरोपीच्या गावामध्ये पुणे पोलिसांनी ड्रोन आणि श्वान पथकाच्या माध्यमांतून दिवसभर आरोपीचा शोध घेतला.

आरोपी दत्तात्रय गाडे हा गुणाट गावातील एका नातेवाईकाच्या घरी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास पाणी पिण्यास आला होता.मला पश्चाताप झाला असून पोलिसांसमोर सरेंडर व्हायच असल्याच सांगून आरोपी हा नातेवाईकांच्या घरापासून निघून गेला.

मात्र अनेक अडथळ्यांचा सामना पोलिसांना करावा लागला,अखेर रात्रीच्या सुमारास गुणाट गावातून आरोपी दत्तात्रय गाडे या आरोपींला पोलिसांनी अटक केली असून लष्कर पोलिस स्टेशन येत आणण्यात आले आहे.या आरोपीची वैद्यकीय तपासणी करून दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास पुणे जिल्हा सत्र न्यायालयात हजर केल जाणार असल्याचे पुणे पोलिसांनी कळवले आहे.

## रेल्वे स्थानकांच्या मराठी नोंदीच चुकीच्या

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एकीकडे मराठी भाषा गौरव दिनी मध्य रेल्वेमार्गावरील स्थानके मराठी अभिमान गीताने दुमदुमत असली तरी दुसरीकडे स्थानकांची नावे चुकीची लिहिली जात आहेत. त्याबाबत प्रवाशांनी वारंवार तक्रारी करून देखील नावांत बदल झालेला नाही. म ध्य रेल्वेच्या मूळ दस्तऐवजातच स्थानकांच्या मराठी नावांची नोंद चुकीची असल्याचे माहिती अधिकारातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ट्रान्स हार्बर मार्गावरील 'ऐरोली', 'रबाळे', 'घणसोली', 'कोपरखैरणे' या स्थानकांची नावे अनुक्रमे 'ऐरावली', 'राबाडा', 'घनसोली, 'कोपर खैर्ना' अशी लिहीली जात आहेत.

मध्य रेल्वेच्या अख्त्यारितील ट्रान्स हार्बर मार्गिका नोव्हेंबर २००४ रोजी सुरू करण्यात आली. त्यानंतर २००७ साली रबाळे स्थानक सुरू झाले. ट्रान्स हार्बर मार्गिका सुरू झाल्याने ठाणे ते नवी मुंबईला जाणारा वेगवान आणि स्वस्त मार्ग सुरू झाला. परंतु, ट्रान्स हार्बर मार्गावरील रेल्वे स्थानकांची नावे चुकीच्या पद्धतीने उच्चारली जातात. तसेच चुकीच्या पद्धतीने लिहून दर्शनी भागी लावण्यात येतात. त्यामुळे त्या गावांच्या मूळ मराठी नावांचा अपभ्रंश होत आहे. याबाबत समाज माध्यमांवरून अनेक प्रवाशांनी तक्रारी केल्या आहेत. स्थानकांच्या नावात दुरूस्ती करण्याची मागणी केली आहे. परंतु, मध्य रेल्वेने त्या तक्रारींवर कोणत्याही प्रकारे कार्यवाही न केल्याने स्थानकांची चुकीची नावे अंगवळणी पडत आहेत. हे अन्यायकारक आहे, असे मत प्रवाशांनी व्यक्त केले.

माहिती अधिकारी कार्यकर्ते अक्षय महापदी यांनी ठाणे ते वाशी रेल्वेमार्गावरील स्थानकांच्या नावांची मराठी आणि इंग्रजीम धील अधिकृत नोंद माहिती अधिकारांतर्गत मागितली होती. मध्य रेल्वेच्या संबंधित विभागाने माहितीनुसार ठाणे, दिघा गाव, ऐरावली, राबाडा, घनसोली, कोपर खैर्ना, तुर्भे, सानपाडा, वाशी अशी स्थानकांची नोंद असल्याचे आढळले आहे. त्यामुळे ऐरोली रेल्वे स्थानकाचे नाव 'ऐरावली', रबाळे रेल्वे स्थानकाचे नाव 'राबाडा', घणसोली रेल्वे स्थानकाचे नाव 'घनसोली' आणि कोपर खैरणे रेल्वे स्थानकाचे नाव 'कोपर खैर्ना' असे चुकीच्या पद्धतीने लिहिले जात आहे. परिणामी, लोकलमधील सूचना फलकावर व इतर ठिकाणी रेल्वे स्थानकांची चुकीची नावे प्रवाशांच्या दृष्टीस पडत आहेत.

रेल्वेकडून महापुरुषांच्या नावाचा अनादर

मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावरील टिळकनगर रेल्वे स्थानक, लोकमान्य टिळक टर्मिनस या स्थानकाचे नाव हिंदीतही टिळक असे अपेक्षित आहेत. कारण हिंदी वर्णमालेत 'ट' वर्ण आहे. मात्र, अजूनही 'तिलक'असेच लिहिले जाते. यामुळे संपूर्ण देशात त्यांचे नाव विकृत स्वरूपात लिहिले जात असून मध्य रेल्वेकडून महापुरुषांच्या नावाचा अनादर केला जात आहे, असे मत मराठीप्रेमींनी व्यक्त केली.

## मराठीचा अभिमान बाळगा; म्हणत उद्धव ठाकरेंचं खुमासदार भाषण, एकनाथ शिंदेंना म्हणाले, गद्दारीचा शिक्का..

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जमलेल्या माझ्या तमाम मराठी बांधवांनो आणि भगिनींनो. मी आता हे म्हटल्यावर उद्या पेपरमध्ये बातमी येणार उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडलं. पण मी मागेही म्हटलं होतं. हिंदुत्व म्हणजे धोतर नाहीये सोडायला. गर्व से कहो हम हिंदू है ही घोषणा बाळासाहेब ठाकरेंनी दिली होती. गर्व से कहो है हिंदू है ही घोषणा तर आपली आहेच. पण मी म्हणतोय की अभिमानाने आणि स्वाभिमानाने म्हणा की मी मराठी आहे. असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित खास कार्यक्रम ात उद्धव ठाकरेंनी हे वक्तव्य केलं.



**१९६६ मध्ये शिवसेना नावाची ठिणगी पडली आणि तिचा वणवा झाला-उद्धव ठाकरे**

१९६६ मध्ये मराठी माणूस थकलेल्या मानसिकतेत होता. त्या काळोखात एक ठिणगी पडली त्याचा वणवा झाला ती ही शिवसेना. आज मराठी भाषा दिन आहे. काल महाशिवरात्र आहे, त्याआधी शिवजयंती झाली. आता गुढी पाडवा येणार. आपल्या फोनवर मेसेज येतील हॅपी गुढीपाडवा वगैरे. मला तर वाटतं आहे की शुभेच्छा मराठीत द्यायला पाहिजेत त्याची गरज आहे. या दिवशी कुसुमाग्रज यांच्या कविता आपण ऐकत असतो. मराठी भाषा गौरव दिन आपण उत्सवासारखा साजरा करतो. कुठेतरी एक चिंतेची किनारही लागली आहे. कारण गद्दारी करुन आपलं सरकार पाडल्यानंतर हमे मराठी नहीं आती हे आपल्याला ऐकून घ्यावं लागतं. असं जिथे ऐकू जाईल तिथे त्याच्या कानाखाली मराठीचा आवाज उमटला पाहिजे. महाराष्ट्र गीत वगैरे नुसतं ऐकत जायचं का आपण? ते वा वा करण्यासाठी नाही. त्या गाण्यात महाराष्ट्राचं वर्णन आहे त्याप्रमाणे वागा. तसं वागलो तर मराठी भाषेलाही आपला अभिमान वाटेल.

मराठी साहित्य संमेलन दिल्लीत पार पडलं. त्यात पंतप्रधान जे बोलले ते बोलले. पण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा तारा भवाळकर यांच्या भाषणावर चर्चा व्हायला होती. मला त्यांचं भाषण आवडलं कारण राज्याला दिशा दाखवणारं ते भाषण होतं. मी जैविक नाही म्हणणाऱ्यावर आपण विश्वास ठेवायचा का? जो म्हणतो मला भगवान ने भेजा है त्याच्यावर आपण विश्वास ठेवतो. साधू संतांनी आपल्याला जगावं कसं हे सांगितलं आणि दाखवून दिलं. भवाळकर यांनी कुंकू याबाबतही बोलल्या. माझ्या आजोबांच्या विचारांशी मिळतेजुळते त्यांचे विचार आहेत. असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

**कितीही डुबक्या मारल्या तरी गद्दारीचा शिक्का तसाच राहणार- उद्धव ठाकरे**

एका बाजूला आपण मंगळावर यान गेलं म्हणून आपण फटाके वाजवतो. मंगळवार यान उतरत असताना पृथ्वीवर आपण माणसाच्या पत्रिकेत मंगळ शोधत असतो. मंगळावर माणूस आणि माणसाच्या पत्रिकेत मंगळ नेमकं जायचं आहे कुठे तुम्हाला? चांगला नागरिक म्हणून जगायला शिकवणं म्हणजे संस्कार असतात. आत्ताही मला गंगेचं पाणी दिलं. नमामी गंगा वगैरे सगळं आहे. मी गंगेमध्ये जाऊन स्नान करुन आलो पण इकडे ५० खोके घेतले आणि तिकडे डुबकी मारुन आलो त्याचा उपयोग काय? महाराष्ट्राशी गद्दारी करायची आणि तिकडे जाऊन डुबकी मारुन यायची. काहीही झालं कितीही डुबक्या मारल्या तरीही गद्दारीचा शिक्का तसाच राहणार आहे.

**दुबईला जाऊन मॅच पाहणारे आपल्याला बाळासाहेबांचे विचार शिकवणार का?**

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. या राजधानीतल्या रंगभूमीने मोठं योगदान दिलं आहे. त्या त्या वेळी आवश्यक असलेली नाटकं आणली गेली आणि **पान ४ वर**

## 'संघर्षाच्या काळात भारत विश्वासू:' युरोपियन महासंघाच्या अध्यक्षांचे मत

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

जगभरात सुरू असलेल्या टॅरिफ वॉरच्या पार्श्वभूमीवर, युरोपियन महासंघाच्या प्रमुख उर्सुला वॉन डेर लेयन संपूर्ण युरोपियन युनियन सरकारसोबत (कॉलेज ऑफ कमिशनर्स) भारत दौऱ्यावर गुरुवारी पोहोचल्या. त्यांनी दिल्लीतील इंडिया गेटचा फोटो त्यांच्या एक्स अकाऊंटवरून शेअर करत भारत दौऱ्याची माहिती दिली आहे. तसेच त्यांनी भारताला संघर्षाच्या काळातील विश्वासू मित्र देखील म्हटले आहे.

युरोपियन महासंघाच्या अध्यक्षा उर्सुला यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, माझ्या आयुक्तांच्या टीमसोबत मी दिल्लीत पोहोचले आहे.

सध्याच्या संघर्ष आणि तीव्र स्पर्धेच्या युगात तुम्हाला विश्वासू मित्रांची आवश्यकत आहे. त्यामुळे युरोपीयन महासंघासाठी भारत हा एक मित्र आणि धोरणात्मक सहयोगी असल्याचे उर्सुला यांनी म्हटले आहे.

तसेच दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी पुढील स्तरावर कशी नेता येईल यावर मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## राज्यातील बसस्थानके सीसीटीव्हीच्या निगराणीत

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश; महिला सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवणार

मुंबई : पुण्यातील स्वारगेट बसस्थानकातील शिवशाही बसमध्ये झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील सर्वच बसस्थानके आणि आगारांच्या सुरक्षेच्या मुदद्यांकडे गांभीर्याने लक्ष केंद्रीत केले आहे. राज्यातील सर्वच बसस्थानक व आगारांचे तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण देतानाच, राज्यभरात सर्वच एसटी बसस्थानके व आगारांमध्ये एसटी बसस्थानके ची एआय तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत यंत्रणा उभारण्यात यावी. महिला सुरक्षा रक्षक नेमावेत, असे निर्देश प्रताप सरनाईक यांनी गुरूवारी दिले.

बसस्थानकांमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षा विषयक आढावा बैठक अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या दालनात घेण्यात आली. बैठकीला परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव व एसटी महामंडळाचे अध्यक्ष संजय सेठी, परिवहन आयुक्त व एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय (प्रभारी) विवेक भीमनवार, सहसचिव राजेंद्र होळकर, एसटी महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते. महिला प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसस्थानकावर असलेल्या सुरक्षा रक्षकांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्याच्या सूचनाही मंत्री सरनाईक यांनी दिल्या. राज्यातील सर्वच बसस्थानक व आगारांचे तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण करण्यात यावे. तसेच बसस्थानक व आगारांमध्ये उभ्या ठेवण्यात येत असलेल्या निर्लेखन बसेस व परिवहन कार्यालयांकडून कारवाईमध्ये जप्त केलेल्या वाहनांचे १५ एप्रिलपर्यंत निष्कासन करण्याचे निर्दे श त्यांनी दिले. यावेळी परिवहन मंत्री म्हणाले, नवीन येणाऱ्या बसेसमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात यावे. बसेसमध्ये जीपीएस यंत्रणा बसविण्याचे काम गतीने पूर्ण करण्यात यावे. स्थानिक पोलिसांची मदत घेऊन त्यांची गस्त बसस्थानकावर वाढवण्यात यावी, आगार व्यवस्थापक हे त्या आगाराचे पालक असल्यामुळे त्यांनी तेथील निवासस्थानामध्येच वास्तव्य करावे! जेणेकरून २४ तास त्यांच्या निरीक्षणाखाली आगाराचे व्यवस्थापन चालेल. याबरोबरच बसस्थानकावर काम करणाऱ्या प्रत्येक एसटी कर्मचाऱ्याला त्याचे ओळखपत्र देण्यात यावे, जेणेकरून कर्मचारी असल्याचे भासवून प्रवाशांना कोणी लुबाडणार नाही. तसेच बसस्थानक अथवा आगारांमध्ये आलेल्या प्रत्येक बसची नोंदणी सुरक्षा रक्षकाकडे होणे अत्यंत आवश्यक आहे.

आरोपींची माहिती देणाऱ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस- स्वारगेट येथील राज्य परिवहन बसमध्ये झालेल्या बलात्कार प्रकरणातील आरोपींची माहिती देणाऱ्याला पुणे पोलिसांनी एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. दत्तात्रय गाडे असे आरोपीचे नाव असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. पुणे पोलिसांनी आरोपीला पकडण्यात मदत करण्याचे जनतेला आवाहन केले आहे. तसेच, या प्रकरणातील आरोपींची माहिती देणाऱ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे, असे पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले. गाडेबद्दल माहिती ०२०-२४४४२७६९ किंवा ९८८१६७०६५९ या क्रमांकावर देता येईल. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल, असेही पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले. दरम्यान, संशयिताचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी एकूण १३ पथके तैनात करण्यात आली आहेत, ज्यामध्ये गुन्हे शाखेच्या आठ पथके आणि स्वारगेट पोलीस ठाण्याच्या पाच पथके काम करत आहेत. शोध अधिक तीव्र करण्यासाठी पोलीस पथके जिल्ह्याबाहेरही पाठवण्यात आली आहेत. आरोपी गाडे लिफ्ट देऊन महिलांना लुटायचा - स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्काराच्या घटनेनंतर राज्यभरात पडसाद उमटत आहेत. या घटनेतील संशयित आरोपी दत्तात्रय गाडे हा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर याआधीही वेगवेगळ्या पोलीस स्थानकात गुन्हे दाखल आहेत. तो शिरूर तालुक्यातल्या गुनाट या गावचा आहे.

दरम्यान, आरोपी दत्तात्रय गाडे हा गुनाट गावापासून दोन किमी अंतरावर असलेल्या उसाच्या शेतात लपून बसल्याची शंका पोलिसांना आल्यानंतर त्याचा शोध घेण्यात आला. पोलिसांकडून ड्रोन आणि डॉग स्क्वॉडच्या सहाय्याने आरोपीचा शोध घेतला. पण आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना उशिरापर्यत यश आले होते.

## बनावट नावांनी जामीन घेऊन न्यायालयाची फसवणूक, दोषीस सक्तमजुरीची शिक्षा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बनावट नावांनी जामीन मिळवून न्यायालयाची फसवणूक केल्याप्रकरणात दोषी ठरलेला जामीनदार राजेश किशनराव दाभाडे (रा. जालना) याला विविध कलमांखाली ५ वर्षे सक्तमजुरी आणि २१ हजार रुपये दंडाची शिक्षा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जी. डी. गुरनुले यांनी गुरुवारी सुनावली.

या प्रकरणात मुख्य न्यायदंडाधिकारी कार्यालयातील सहायक अधीक्षक नितीन राजेश मराठे (४९) यांनी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार, मराठे हे ३ जून २०२१ रोजी कर्तव्यावर हजर राहून दैनंदिन कामकाज करत असताना सिडको पोलीस ठाण्यातील एका गुन्ह्यात आरोपी मोबीन अजीज शेख याचा जामीन घेण्यासाठी वकिलामार्फत राजेंद्र हरबक (रा. चापडगाव ता. घनसावंगी) याच्या नावे असलेला पी. आर मुद्रांकशुल्क व इतर दस्तावेज सादर करण्यात आले होते. त्या वेळी कागदपत्रांवरील छायाचित्रावरून संबंधित व्यक्तीने यापूर्वीही जामीन घेतलेला असल्याची मराठे यांना शंका आली. त्यांनी तपास केला असता, आरोपीने २१ मे २०२१ रोजी मुकुंदवादी पोलीस ठाण्यातील एका गुन्ह्यात आरोपी इम्रान अली रशिद अली या आरोपीचा वकिलामार्फत भागुजी पालवे (रा. करडगाव, ता. घनसावंगी) याच्या नावे जामीन घेतल्याचे समोर आले. दोन्ही प्रकरणांत नावे वेगवेगळी असून, छायाचित्र मात्र एकच असल्याचे उघडकीस आले. ही बाब मराठे यांनी वरिष्ठांना कळवली. तेव्हा न्यायालयात कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत अटक केली. प्रकरणात वेदांतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ‘एकतेचा महाकुंभ’ नव्या युगाची पहाट

प्रयागराजच्या पवित्र भूमीवर महाकुंभ यशस्वीरित्या संपन्न झाला आहे. जेव्हा देशाची जाणीव जागृत होते, जेव्हा ती अधीनतेच्या शतकानुशतके जुन्या मानसिकतेच्या जोखडातून मोकळी होते, तेव्हा ती नव्या ऊर्जेने भरलेल्या ताज्या हवेत मोकळा श्वास घेते. याचाच परिणाम प्रयागराज येथे १३ जानेवारीपासून सुरू झालेल्या एकता का महाकुंभ म्हणजेच एकतेच्या महाकुंभमध्ये पाहायला मिळाला.

दिनांक २२ जानेवारी, २०२४ रोजी, अयोध्येत राम मंदिराच्या प्राण प्रतिष्ठेच्या वेळी मी देवभक्ती आणि देशभक्ती म्हणजेचे अनुक्रमे दैवी शक्तींची भक्ती आणि राष्ट्राची भक्ती याबाबत विचार मांडले होते. प्रयागराज येथील महाकुंभात देवी, देवता, संत, महिला, लहान मुले, तरुण वर्ग, ज्येष्ठ नागरिक आणि जीवनाच्या सर्व स्तरांवरील लोक एकत्र आले. देशामध्ये जागृत झालेल्या जाणिवेचे दर्शन यावेळी घडले. या पवित्र पर्वासाठी सुमारे १४० कोटी भारतीयांच्या भावना एकाच जागी, एकाचवेळी एकवटल्या होत्या, असा हा एकतेचा महाकुंभ होता. या ४५ दिवसांत देशाच्या प्रत्येक कानाकोप□्यातून कोट्यवधी लोक संगमावर येत होते. संगमाच्या जागी भावभक्तीच्या लाटा उसळत होत्या. प्रत्येक भाविक येथे एकाच उद्देशाने आला. संगमात स्नान करणे. गंगा, यमुना आणि सरस्वती यांचा हा पवित्र संगम प्रत्येक यात्रेकरूंचे मन उत्सुकता, ऊर्जा आणि विश्वासाने भरून टाकत होता. प्रयागराजमधील महाकुंभ म्हणजे आधुनिक व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिक, नियोजन आणि धोरण क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्यासाठी एक अभ्यासाचा विषय ठरला आहे. जगात या भव्यतेशी समांतर असेल किंवा त्याचे उदाहरण ठरेल असे आयोजन कुठेही झालेले नाही.

प्रयागराज येथे नद्यांच्या संगमाच्या ठिकाणी, किना□्यांवर कशा प्रकारे कोट्यवधी लोक गोळा झाले ते संपूर्ण जगाने आश्चर्यचकित होऊन पाहिले. या लोकांना कोणतेही औपचारिक निमंत्रण देण्यात आले नव्हते आणि कधी-कुठे जायचे आहे यासंदर्भात त्यांच्यात आधी कोणताही संवाद झालेला नव्हता. तरीही, कोटींच्या कोटी लोक स्वतःच्या मर्जीने महाकुंभाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी निघाले आणि त्यांनी पवित्र जलात स्नान करण्याचे भाग्य अनुभवले. या पवित्र स्नानानंतर अतीव आनंद आणि समाधानाने चमकणारे त्यांचे चेहरे मी विसरू शकत नाही. महिला, वयोवृद्ध, आपले दिव्यांग बंधू-भगिनी अशा सर्वांनी संगमावर पोहोचण्याचा मार्ग शोधून काढला. या सोहळ्यात भारतातील तरुणांचा प्रचंड प्रमाणातील सहभाग बघणे माझ्यासाठी विशेष हृदयस्पर्शी होते. महाकुंभासारख्या पर्वात तरुण पिढीचा सहभाग असा गहन संदेश देतो की भारतीय युवक आपल्या वैभवशाली संस्कृती आणि वारशाचे मशालवाहक असतील. ही संस्कृती आणि वारसा जपण्याची त्यांची जबाबदारी त्यांना माहीत असून ती पुढे नेण्याप्रती ते कटिबद्ध आहेत. महाकुंभात उपस्थित राहण्यासाठी प्रयागराजला आलेल्या लोकांच्या संख्येने निःसंशयपणे नवे विक्रम रचले आहेत. मात्र, प्रत्यक्ष तेथे हजर असलेल्या लोकांबरोबरच जे प्रयागराजला पोहोचू शकले नाहीत असे कोट्यवधी लोक देखील मनाने या सोहळ्याशी घट्टपणे बांधले गेले होते. तेथे गेलेल्या भाविकांनी आणलेले पवित्र जल लाखो लोकांसाठी अध्यात्मिक आशीर्वादाचा स्त्रोत ठरले.महाकुंभाला उपस्थित राहून परतलेल्या अनेकांचे त्यांच्या गावांमध्ये आदराने स्वागत झाले, समाजाने त्यांचा गौरव केला. गेल्या काही आठवड्यांत जे घडले, ते अभूतपूर्व असून, त्याने येणा□्या काही शतकांसाठी पाया रचला आहे. प्रयागराजमध्ये कल्पनेपेक्षा अधिक भाविक दाखल झाले. कुंभमेळ्यातील मागील अनुभवांच्या आधारावर प्रशासनाने भाविकांच्या उपस्थितीचा अंदाज बांधला होता. या एकतेच्या महाकुंभात अमेरिकेच्या लोकसंख्येच्या जवळजवळ दुप्पट संख्येने भाविक सहभागी झाले. अध्यात्माच्या अभ्यासकांनी कोट्यवधी भारतीयांच्या या उत्साही सहभागाचे विश्लेषण केले, तर त्यांना असे दिसून येईल, की आपल्या वारशाचा अभिमान बाळगणारा भारत आता एका नव्या ऊर्जेने पुढे जात आहे. मला विश्वास आहे की, ही एका नवीन युगाची पहाट आहे, जी नव्या भारताचे भविष्य लिहिणार आहे.

हजारो वर्षांपासून या महाकुंभाने भारताची राष्ट्रीय जाणीव बळकट केली आहे. प्रत्येक पूर्णकुंभात संत, अभ्यासक आणि विचारवंत आपापल्या काळातील समाजाच्या स्थितीवर चर्चा करण्यासाठी एकत्र येत होते. त्याचे प्रतिबिंब देशाला आणि समाजाला नवी दिशा देत होते. दर सहा वर्षांनी अर्धकुंभादरम्यान या कल्पनांचा आढावा घेतला जात असे. १४४ वर्षांच्या १२ पूर्णकुंभ सोहळ्यानंतर, कालबाह्य परंपरांचा त्याग करण्यात आला, नवीन कल्पना आत्मसात करण्यात आल्या आणि काळाबरोबर पुढे जात नव्या परंपरा निर्माण करण्यात आल्या. १४४ वर्षांनंतर यंदाच्या महाकुंभात आपल्या संतांनी पुन्हा एकदा भारताच्या विकासयात्रेसाठी नवा संदेश दिला आहे. तो संदेश म्हणजे, विकसित भारत. या एकतेच्या महाकुंभात प्रत्येक भाविक, मग तो श्रीमंत असो वा गरीब, तरुण असो वा वृद्ध, खेड्या-पाड्यातील असो वा शहरातील, भारतातील असो, अथवा परदेशी, पूर्वेकडील असो, की पश्चिमेकडील, उत्तरेकडील असो, की दक्षिणेकडील, जात, पात, विचारधारा यांचा विचार न करता या ठिकाणी सर्वजण एकत्र आले. कोट्यवधी लोकांमध्ये आत्मविश्वास जागवणा□्या ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ या संकल्पनेचे हे मूर्त रूप होते. विकसित भारताच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी आता आपण याच भावनेने एकत्र यायला हवे. श्रीकृष्णाने बालपणी यशोदा मातेला आपल्या मुखात संपूर्ण विश्वाचे दर्शन घडवले होते, तो प्रसंग मला आठवतो.

# विद्यार्थी मित्रांनो, विज्ञानाकडे वळा

**भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान परिषद आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. रामन इफेक्टचा शोध लागल्याने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या शोधाची घोषणा भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकटरामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी केली होती. या शोधाबद्दल त्यांना १९३० मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले होते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा आपल्या ज्ञानात भर घालणारा सदर संकलित लेख... संपादक**

**राष्ट्रीय विज्ञान दिवसः रमन इफेक्ट दिन**

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.वसंतराव गोवारीकर सन १९८७ साली भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे सचिव असताना त्यांनी ज्या अनेक योजना सुरू केल्या त्यातील एक योजना म्हणजे देशात विज्ञानाचे वातावरण निर्माण करण्यासाठी दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणे. डॉ.वसंतराव गोवारीकरांच्या मनात आले की भारतात विज्ञानाचा एकमेव नोबेल पुरस्कार डॉ.सी.व्ही. रामन यांना मिळाला आहे, तर त्यांच्याशी संबंधितच तो दिवस असावा. शिवाय तो त्यांचा जन्म अथवा मृत्युदिन निवडण्यापेक्षा त्यांनी ज्या दिवशी त्यांचा निबंध जगप्रसिद्ध नेचर या विज्ञान मासिकाला पाठवला आणि ज्याला पुढे सन १९३० साली नोबेल पुरस्कार मिळाला ती तारीख का निवडू नये? अखेर जी तारीख निघाली ती २८ फेब्रुवारी ही होय.

डॉ.सी.व्ही. रमन यांचा जन्म तामिळनाडूमधील तिरुचिरापल्ली आणि शिक्षण चेन्नई येथे झाले. त्यांनी कोलकाता विद्यापीठात सन १९१७-१९३३ भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ.रमन हे काही काळ बंगलोरातही होते, १९४७ साली ते रमन संशोधन संस्थेचे संचालक झाले. त्यांचे दि.६ मे १९०७ रोजी लोकासुंदरी अम्मलबरोबर लग्न झाले होते. त्यांना चंद्रशेखर आणि रेडिओ-खगोलशास्त्रज्ञ राधाकृष्णन हे दोन पुत्र होते. डॉ.रमन हे चंद्रशेखर सुब्रह्मण्यन यांचे काका होते. सन १९८३मध्ये चंद्रशेखर यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले.

नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ. सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. हिंदू तमिळ ब्राह्मण पालकांच्या पोटी जन्मलेले रमन हा एक अनमोल मुलगा होता. त्याने सेंट अलॉयसियसच्या अँग्लो-इंडियन हायस्कूलमधून अनुक्रमे ११ आणि १३ वर्षांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. वयाच्या १६ व्या वर्षी प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्रात सन्मानाने त्यांनी मद्रास विद्यापीठात पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला. पदवीधर विद्यार्थी असताना सन १९०६ साली त्यांचा पहिला संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आला. पुढच्या वर्षी त्यांनी एमएची पदवी मिळवली. कोलकाता येथील इंडियन फायनान्स सर्व्हिसमध्ये असिस्टंट अकाउंटंट जनरल म्हणून रुजू झाले, तेव्हा ते १९ वर्षांचे होते. तेथे त्यांची इंडियन असोसिएशन फॉर द अप्लाइन्शन ऑफ सायन्स- आयएसएस या भारतातील पहिल्या संशोधन संस्थेशी ओळख झाली, ज्यामुळे त्यांना स्वतंत्र संशोधन करण्याची परवानगी मिळाली आणि ध्वनी आणि ऑप्टिक्समध्ये त्यांनी मोठे योगदान दिले. रमन यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

ऑक्टोबर १९७०च्या शेवटी रमण त्यांच्या प्रयोगशाळेत कोसळले; त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले आणि डॉक्टरांनी त्यांना चार दिवस जगण्यासाठी मुदत दिली. ते वाचले आणि काही दिवसांनी त्यांनी रुग्णालयात राहण्यास नकार दिला, कारण त्यांनी त्यांच्या अनुयायांनी वेढलेल्या त्यांच्या संस्थेच्या बागेमध्ये मरणे पसंत केले. रमनच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी त्यांनी आपल्या एका माजी विद्यार्थ्यास सांगितले, ‘अकादमीच्या नियतकालिकांना मरण येऊ देऊ नका, ते देशात विज्ञानाच्या गुणवत्तेचे संवेदनशील संकेतक आहेत.’ ती संध्याकाळ, रमन यांनी आपल्या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाशी भेट घेण्यात आणि त्यांच्याबरोबर संस्थेच्या व्यवस्थापनासंबंधी कार्यवाहीबद्दल त्यांच्याशी चर्चा करण्यात घालवली. दि.२१ नोव्हेंबर १९७०च्या रात्रीनंतर रमन यांचा दुसऱ्या दिवशी पहाटे नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू झाला. सन १९१७मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या राजाबाजार विज्ञान महाविद्यालयात आशुतोष मुखर्जी यांनी त्यांना भौतिकशास्त्राचे पहिले पालित प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. आपल्या पहिल्या युरोप दौऱ्यात भूमध्य समुद्र पाहून त्याला समुद्राच्या निळ्या रंगाचे वर्णन करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी १९२६ मध्ये इंडियन जर्नल ऑफ फिजिक्सची स्थापना केली. त्याने आणि कृष्णन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रकाश विखुरल्याची एक अभिनव घटना शोधून काढली, ज्याला त्यांनी ‘सुधारित विखुरणे’ असे संबोधले, पण त्याला रामन परिणाम म्हणून ओळखले जाते. भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. रमन सन १९३३ साली बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये पहिले भारतीय संचालक बनले. तेथे त्यांनी त्याच वर्षी इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसची स्थापना केली. त्यांनी सन १९४८ साली रमन रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली.

तेथे त्यांनी शेवटच्या काळात काम केले. त्यांच्या रमन परिणाम- प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅटरिंग या शोधासाठी ते ओळखले जातात. सन १९३०चे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक रमन यांना मिळाले होते. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे उद्दिष्ट असे की, लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विज्ञानाचे महत्त्व सांगण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिन दरवर्षी साजरा केला जातो.

मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलाप, प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे. सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि विज्ञान क्षेत्रात विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. देशातील वैज्ञानिक विचारांच्या नागरिकांना संधी देणे. लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान लोकप्रिय करण्यासाठी. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे आणि त्यांना प्रेरित करणे आणि विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे. विज्ञानाशिवाय विकासाचा मार्ग वेगाने पुढे जाऊ शकत नाही. विज्ञान गैरसमज आणि अंधश्रद्धा नष्ट करते. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रसिद्ध करण्यासोबतच देशातील नागरिकांना या क्षेत्रात संधी देऊन नवीन उंची गाठणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. देशाच्या विकासासाठी वैज्ञानिक विचारांचा प्रसार आवश्यक आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनासारखे कार्यक्रम वैज्ञानिक वृत्तीचा प्रसार करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरू शकतात. विज्ञानाच्या माध्यमातूनच आपण समाजातील लोकांचे जीवनमान अधिकाधिक सुखी करू शकतो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय आणि इतर विज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान अकादमी, शाळा आणि महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्था यासारख्या सर्व विज्ञान संस्थांमध्ये या दिवशी विविध वैज्ञानिक उपक्रमांशी संबंधित कार्यक्रम आयोजित केले जातात. महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये भाषणे, निबंध, शास्त्रज्ञांचे लेखन, विज्ञान प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन, परिसंवाद आणि परिसंवाद इत्यादींचा समावेश होतो. विज्ञान क्षेत्रातील विशेष योगदानासाठी राष्ट्रीय आणि इतर पुरस्कारही जाहीर केले जातात. विज्ञानाची लोकप्रियता वाढवण्यासाठी विशेष पुरस्कारही ठेवण्यात आले आहेत.

!! राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या समस्त भारतीय भावाबहिणींना हार्दिक शुभेच्छा !!

# अभिजात भाषा : मराठीचा गौरव!

**‘मराठी’** भाषा ही आपली जननी आहे. या भाषेला समृद्ध इतिहास व परंपरा लाभलेली आहे. याच भाषेतून आपण आपल्या भावना, विचार प्रभावीपणे व्यक्त करीत आहोत आणि म्हणूनच काळाच्या ओघात भाषेच्या स्वरूपात कधीही बदल न होणारी, अलौकिक सौंदर्य लाभलेली कुलीन, सुसंस्कृत, उच्च, सभ्य व चिरकाल टिकणारी भाषा म्हणून आपण अभिजात भाषेला म्हणजेच पर्यायाने ‘मराठी’ भाषेला मनापासून मानतो. मागील महिन्यात केंद्र सरकारने मराठी भाषेला ‘अभिजात भाषा’ हा दर्जा प्रदान केलाय, याचा मनस्वी आनंद आहे. पण मी मराठी भाषेची अभ्यासक असल्याने माझी आई सुंदर आहे, अभिजात आहे, असे मला मनापासून वाटत असल्याने मी लिहिलेली व माझे पती आतिश सोसे यांनी संपादित केलेली ‘अभिजात मराठी’ व ‘माय मराठी’ या शीर्षकांची पाठ्यपुस्तके सीबीएसई व आयसीएई शाळांमधून पूर्व प्राथमिक ते आठव्या इयत्तेपर्यंत मागील तीन वर्षांपासून महाराष्ट्रभर शिकविली जात आहेत, त्याचा शासनाद्वारे, अभ्यासकांद्वारे गौरव केला जातोय आणि आज आमच्या तीन दशकांहूनही अधिक मराठी भाषिक लेखन व कार्याला यानिमित्ताने सन्मानच लाभल्याने अत्यानंद झाला आहे, अशी भावना मनाला फार समाधान देत आहे.

आपले राज्य महाराष्ट्र. आपल्या राज्याची मातृभाषा, राजभाषा ही मराठी. भाषेला आपण आपली आई म्हणतो. त्या अर्थाने आपली ‘मराठी भाषा’ आता ३ ऑक्टोबर २०२४ पासून ‘अभिजात भाषा’ म्हणून गौरविली गेली आहे.अभिजात भाषा म्हणजे चिरकाल टिकणारी व सौंदर्यप्रधान असलेली सुसंस्कृत भाषा होय. असे म्हटले जाते की, इ. स. पू. २०७ मध्ये ब्राम्ही लिपी आणि मराठी भाषेतील शिलालेख सापडला. इ. स. पू. तीनशे वर्षांपूर्वी मराठी भाषा बोलली जात होती. मराठी भाषेत काळानुरूप बदल होत गेले. आद्यकाल, यादवकाल, बहामनीकाल, छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ, इंग्रजांचा काळ आणि पेशवे काळ या दरम्यान मराठी भाषेत वृद्धी झाली.

सर्वप्रथम सातवाहन राजांनी मराठी भाषेचा वापर व्यवहार, प्रशासनात केल्याचा दाखला मिळतो. त्यानंतर यादवांच्या काळात मराठी संस्कृती व भाषा भरभराटीस आली. इ .स. ११८८ मध्ये आद्यकवी मुकुंदराज यांनी ‘विवेकसिंधू’ तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी इ. स. ११९० मध्ये ‘ज्ञानेश्वरी’ हा ग्रंथ लिहून मराठी भाषेला राजाश्रय मिळवून दिला. इ. स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्वतंत्ररीत्या निर्मिती होऊन मराठी राजभाषा घोषित करण्यात आले. मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, रामदास, श्रीधर, मुक्तेश्वर, मोरोपंत यांच्यासह अनेक कवींना मराठी भाषेचे आद्य कवी मानले जाते.



आता ही भाषा जगभरात बाहात्तर देशांमध्ये व भारतातील छत्तीस राज्यात बोलली जाते. अधिकृत भाषांमध्ये मराठी भाषेला पंधरावा क्रमांक मिळाला. सुमारे अकरा कोटींहूनही अधिक लोक मराठी भाषा बोलतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. पण त्यासाठी केंद्र सरकारचे काही निकष ठरलेले होते. जसे-भाषेचा नोंदवलेला इतिहास हा अतीव प्राचीन स्वरूपाचा म्हणजे १५०० ते २००० वर्षं जुना हवा, प्राचीन साहित्य हवे, जे त्या भाषिकांना मौल्यवान वारसा वाटते, दुस□्या भाषा समूहाकडून उसनी न घेतलेली अस्सल साहित्यिक परंपरा हवी, ‘अभिजात’ भाषा ही आजच्या भाषेपेक्षा निराळी हवी, असे प्रारूप ठरलेले असल्याने त्यानुसार मराठी भाषा ही अभिजातच आहे, यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून एक अभ्यासपूर्ण अहवाल भारतीय केंद्र सरकारकडे सादर केला होता. प्रारंभी जेव्हा ही भाषा बोलली गेली, तेव्हा महारट्ठी-महरट्ठी-मऱ्हाटी-मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला, असं या अहवालात म्हटलं आहे. महाराष्ट्रीय भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचं वय किमान अडीच हजार वर्षं जुनं असल्याचे पुरावे असल्याचेही या अहवालात म्हटलं आहे.

त्यानुसार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करून ‘मराठी भाषेला’ गौरव मिळवून दिला. भारत सरकारने आतापर्यंत तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत, उडिया आणि आसामी अशा अकरा भाषांना हा अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळे आता या भाषांसाठी काही संस्था नव्याने उभारल्या जातील. तसेच या भाषांमधल्या प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक तरतूदही केली जाईल. मराठी भाषेसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये भरीव अनुदान स्वरूपात दिले जाईल. त्यामुळे मराठीच्या बोलींचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह करणे, भारतातील सर्व चारशे पन्नास विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे, प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व बारा हजार ग्रंथालयांना सशक्त करणे, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा साऱ्यांना भरीव मदत करणे अगदी सुलभ होईल. त्या अर्थाने मराठी भाषेला लाभलेला हा अभिजात भाषेचा अलंकार निश्चितच गौरवणीय असाच आहे.

दि. २७ फेब्रुवारी हा ‘मराठी राजभाषा गौरव दिन’ आहे. कविवर्य कुसुमाग्रज एक श्रेष्ठ आधुनिक कवी, कथाकार, समीक्षक, कादंबरीकार व नाटककार म्हणून कुसुमाग्रज प्रसिद्ध आहेत. त्यांचे पूर्ण नाव विष्णू वामन शिरवाडकर हे असून त्यांनी कुसुमाग्रज या टोपण नावाने लेखन केले आहे. त्यांची जन्मतारीख २७ फेब्रुवारी १९१२ ही असून त्यांचे जन्मस्थळ पुणे आहे. त्यांचा मृत्यू १० मार्च १९९९ रोजी झाला.जीवनलहरी, विशाखा, किनारा, कौंतेय, नटसम्राट ही त्यांची वाचकप्रिय पुस्तके आहेत.महाराष्ट्राचेच नव्हे तर जगभरातील मराठी रसिक आणि वाचकांचे अत्यंत आवडते लेखक, कवी म्हणून कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांचे नाव अतिशय आदराने घेतले जाते. त्यांचे साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रातील मौलिक योगदान, ‘मराठी भाषा’ ही ज्ञानभाषा व्हावी, यासाठी त्यांनी घेतलेले अविरत परिश्रम, ‘ज्ञानपीठ’ या सर्वोच्च पुरस्काराने त्यांचा झालेला सन्मान इत्यादी या सर्व गोष्टींचा बहुमान ‘माय मराठी’ भाषेचा गौरव आणि कुसुमाग्रजांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन म्हणून महाराष्ट्र शासनाने दि. २१ जानेवारी २०१३ रोजी शासन निर्णय काढून दि. २७ फेब्रुवारी (कविवर्य कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस हा ‘मराठी भाषा गौरव दिन’ म्हणून साजरा करण्याचा अध्यादेश काढला. त्या दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्रात हा दिवस अतिशय उत्साहात व आनंदात साजरा करतात. निश्चितच या वर्षातला हा ‘मराठी भाषा गौरव दिन’ ‘अभिजात भाषे’चा दर्जा मिळाल्याने संस्मरणीय राहील, ही भावना मनाला आनंद देणारी आहे. सर्वांना ‘मराठी राजभाषा गौरव दिना’च्या मनापासून शुभेच्छाः!

**– प्रा. दीपाली आतिश सोसे**

# पगार रोखणाऱ्या घाटीच्या डीनवर गुन्हे दाखल करा - आयटकची मागणी !




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुद्दामहून पगार थकवण्याचे आदेश देऊन कामगार कायद्याचा भंग करणारे घाटी हॉस्पीटलचे डीन डॉ शिवाजी सुक्रे यांच्यावर गुन्हे दाखल करा या मागणीसाठी आयटक संलग्न महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटनेने सहाय्यक कामगार उपायुक्त कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करून केली.

याबाबत असे की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपति संभाजी नगर चे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी जानेवारी व फेब्रुवारी २०२५ चा पगार स्वतः आदेश देऊन कोविड योद्धे असलेल्या कामगारांचे पगार थांबवण्याचे आदेश दिले या विरोधात महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटना संलग्न आयटकने कामगार उपायुक्त कार्यालया समोर जोरदार निदर्शने केली . यावेळी घोषणांनी परिसर दणाणून गेला . पगार आमच्या हक्काचा नाही कुणाच्या बापाचा , मुद्दामहुन पगार अडवणाऱ्या घाटीच्या डीनवर गुन्हे दाखल झालेच पाहिजे , उपायुक्त साहेब डीनशी हातमिळवणी करून स्वतः च्या नातेवाईक पेशंटला व्ही आय पी ट्रीटमेंट घेणे बंद करा , कामगार उपायुक्त कार्यालयाने कामगारांसाठी काम केले च पाहिजे, आयटक जिंदाबाद इ घोषणांनी कामगार उपायुक्त परिसर दणाणून गेला. १० - ११ हजार रुपयाच्या तोकड्या पगारात घाटीत १५० पेक्षा जास्त कामगार कसेबसे घर चालवतात. महिना मोठ्या मुश्कीलीने निघतो पगाराची आतुरतेने वाट पाहण्यात डोळ्यात प्राण येतात . आणि डॉ सुक्रे क्रुरपणे दोन दोन महिने पगार थांबवण्याचे आदेश देतात त्यांची दया करू नका कायदया प्रमाणे गुन्हे दाखल करा असे आयटकच्या निवेदनात नमूद आहे . यावेळी सहाय्यक काम गार उपायुक्त कार्यालयातील पडीयाल यांनी निवेदन स्विकारले व तत्काळ डॉ. शिवाजी सुक्रे यां ना फोन केला व सोमवारी दुपारी १२.३० वाजता बैठकीला हजर राहण्यास सांगितले. यावेळी कार्यालयात अनुपस्थित असलेले उपायुक्त राऊत यांच्याशी ॲड . अभय टाकसाळ यांनी फोनवर संपर्क केला व कामगारांच्या व्यथा सांगितल्या. या निदर्शनात ॲड अभय टाकसाळ, अभिजीत बनसोडे, आतिश दांडगे, नंदाबाई हिवराळे, दिपक मगर , रोहीत बट्टुले , बंटी खरात , अमीत भालेराव , छाया लोखंडे, श्रीकांत बनसोडे , श्रीयोग वाघम रे , प्रमीला रत्नपारखे , अंजूम शेख , शिला मूजमुले , कविता जोगदंडे यांच्या सह मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते .

# सिद्धार्थ महाविद्यालयात मराठी दिवस उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय पडेगाव औरंगाबाद येथे आज मराठी दिवसाचे अवचित साधून एक तास ग्रंथालयाच्या सहवासात हा अभिनव उपक्रम संपन्न झाला .याप्रसंगी डॉ. अनिल लहाने यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयाचे संचालक प्रा .सुनील मगरे आणि प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे हे अध्यक्ष स्थानि होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ अनिल लहाने म्हणाले, ग्रंथालय मनुष्याच्या जीवनात मोठ्या प्रमाणावर बदल घडवते. ग्रंथालय ही सर्वात प्राचीन संस्कृती संस्थांपैकी एक आहे. मानवी व सामाजिक कार्यामध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. पूर्वी ग्रंथालयाची भूमिका फक्त कागदपत्रे ठेवण्यासाठी होती .कालांतराने ग्रंथालय विकसित झाले. आणि आज माहितीचा सर्वात लोकप्रिय स्त्रोत ग्रंथालय म्हणून निवडल्या जात आहेत .आज मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यापर्यंत ग्रंथालय एक सामाजिक संस्था बनली आहे .यामध्ये माहिती आणि सांस्कृतिक घटकांचा समावेश आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान फार महत्त्वपूर्ण आहे तेव्हा बाबासाहेब हे लंडनमध्ये ग्रंथालयांमध्ये वाचन करीत होते त्यावेळेस ते दुपारच्या जेवणामध्ये कोटाच्या दोन्ही खिशामध्ये दोन पाव चे तुकडे घेऊन जात असत आणि दुपारच्या जेवणाच्या वेळेत ते पाव ग्लासामध्ये पाण्यामध्ये बुडवून खात होते. ज्यावेळेस तेथील ग्रंथपालास ही बाब माहित झाली त्यावेळेस तो ग्रंथपाल बाबासाहेबांवर खूप रागावला आणि म्हणाला ग्रंथालयामध्ये कुठल्याही प्रकारचे अन्न आणणे गुन्हा आहे. त्यामुळे तुम्हाला शिक्षाही झालीच पाहिजे. त्यावेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर ढसाढसा रडून क्षमा मागितली परंतु त्या ग्रंथपालाने शेवटी असे सांगितले की, उद्यापासून मी तुमच्या जेवणाचा डबा स्वतः घेऊन येणार आहे यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुस्तकावरील आणि ग्रंथावरील प्रेम दिसून येते ते असे म्हणाले होते की जर माझ्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची पुस्तके आणि एक रुपयाची भाकरी याप्रमाणे त्याचा उपयोग करणार. असे संविधान करते बाबासाहेब आंबेडकर ग्रंथाच्या प्रेमामध्ये होते.

यावेळी प्रा सुनील मगरे म्हणाले भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असून १३० कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या असलेला हा जगातील दुसऱ्या क्रम ांकाचा देश आहे. त्यामुळे लोकसंख्या वाढीव प्रमाणात साक्षरता ही वाढली पाहिजे त्याप्रमाणे ग्रंथालयाचे वाचन हे झाले पाहिजे पुढे ते म्हणाले की पुस्तके हा मानवाचा सर्वात चांगला मित्र आहे ज्याप्रमाणे माणूस आपल्या मित्राला प्रत्येक क्षणात प्रत्येक तासात प्रत्येक अडचणीत साथ देतो त्याप्रमाणेच पुस्तके ही माणसाला प्रत्येक दयनीय आणि विचित्र परिस्थितीमध्ये मदत करत असतात प्रत्येक कठीण प्रश्नाचे परिस्थितीचे उत्तर आणि समाधान या पुस्तकांमध्ये दडलेले असते जर एखादी व्यक्ती कोणत्याही अडचणीत असेल तर पुस्तके वाचून समजून त्यांच्या विचारसरणीचा लाभ घेता येतो.

शेवटी अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉक्टर मनोहर वानखडे यांनी उपस्थित आमचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांनी ग्रंथालयामध्ये दररोज एक तास येऊन अभ्यास करावा वाचन करावे त्याप्रमाणे आपण जर दररोज वेगवेगळ्या विषयाचे वाचन केले तर आपल्या बुद्धीची वाढ होईल आणि सार्वजनिक क्षेत्रात समाजात तसेच स्पर्धात्मक युवा मध्ये आपल्याला मात करता येईल असे ते म्हणाले. आता हे स्पर्धेचे युग आहे आणि या स्पर्धेच्या युगामध्ये ग्रंथ प्रेम पुस्तके यावर जेवढे प्रेम करणार जेवढे वाचन करणार तेवढे तुम्ही पुढे जाल असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर मिलिंद आठवले यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा शुभम सदावर्ते यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा. दीपक पाईकराव डॉ विनोद अंभोरे डॉ सुके शनि जाधव शेख सर प्रा पूजा साळवे रोहिणी देवकाते प्रा कल्पना कनकुटे प्रा कुलदीप जाधव प्रा निकिता तुपे आसिफ शेगावकर राम जाधव अनिता काकरवाल मोईन तडवी श्रीकांत पातोडे आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. त्यांचे सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# चोरट्यांची कमाल! चक्क न्यायाधीशांच्या बंगल्यातून चंदनाच्या झाडांची चोरी

अमरावती : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या कांतानगर येथील बंगल्याची कडक सुरक्षा भेदून या परिसरातून चोरट्यांनी दोन चंदनाची झाडे चोरून नेल्याचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. शहरातून यापुर्वी मुख्य वनसंरक्षकांच्या निवासस्थानासह अनेक शासकीय अधिकाऱ्यांच्या बंगल्यांच्या परिसरातून चंदनाच्या झाडांची चोरी झाली आहे. यावेळी अज्ञात चोरट्यांनी थेट प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या घराला लक्ष्य केले आहे. या चोरट्यांना जेरबंद करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

या संदर्भात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या निवासस्थानी चतुर्थश्रेणी म्हणून कार्यरत असलेल्या शुभम विनोद गोलाईत (२८) यांनी पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली की, दररोज प्रमाणे तो काल रात्री १०.४५ वाजता 'नाईट ड्युटी'साठी न्यायाधीशांच्या बंगल्यावर पोहोचला आणि रात्री एक वाजेपर्यंत पोर्चमध्ये खुर्चीवर बसून होता. त्यानंतर त्याने पोर्चमध्येच अंथरूण टाकले आणि तो झोपला. रात्री दोन वाजताच्या सुमारास न्यायाधीशांनी अचानक दरवाजा उघडून त्याला झोपेतून उठवले आणि बाहेरून कशाचा तरी आवाज आल्याचे सांगितले. त्यानंतर तो न्यायाधीशांसह पोर्चम धून बाहेर पडला असता तेथे चंदनाचे झाड कापलेले दिसले, त्यामुळे त्यांनी ड्युटीवर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना हाक मारली आणि मागच्या बाजूला जाऊन पाहण्यास सांगितले. तर बंगल्याच्या मागील भागातील चंदनाचे झाडही तोडण्यात आल्याचे दिसून आले. या दोन्ही झाडांचे वय सुमारे ५ वर्षे असून, ज्यांच्या लाकडाची बाजारातील किंमत सुमारे २० हजार रुपये आहे. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्याची नोंद करून तत्काळ अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू केला. गेल्या वर्षी जून महिन्यात येथील मुख्य वनसंरक्षकांच्या कॅम्प येथील रॅलिज या शासकीय निवासस्थानाचा परिसर आणि एसडीएफ प्राथमिक शाळेच्या आवारातील तीन चंदन वृक्ष कापून अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला होता. मुख्य वनसंरक्षकांच्या (प्रादेशिक) शासकीय निवासस्थान परिसरातील एक चंदनाचे झाड अज्ञात ५ ते ७ जणांनी कटर मशिनच्या साहाय्याने कापून चोरून नेले होता. याशिवाय या परिसरातील अन्य चार चंदनाच्या झाडांना आरा मारण्यात आला होता.

याशिवाय एसडीएफ प्रायमरी स्कूलच्या प्रांगणातील २ वृक्ष चोरट्यांनी चोरून नेली. या तीनही झाडांची किंमत सुमारे २० हजार रुपये इतकी होती. शहरातील शासकीय अधिकाऱ्यांची निवासस्थाने आता चंदन तस्करांचे लक्ष्य बनल्याचे या घटनांमधून दिसून आले आहे.

# महाकुंभाने रचला इतिहास!; अनेक जागतिक विक्रम मोडून नोंदवले गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नाव

**प्रयागराज :** प्रयागराज येथे ४५ दिवस चालणाऱ्या जगातील सर्वात मोठ्या धार्मिक आणि आध्यात्मिक मेळाव्याचा महाकुंभाचा समारोप महाशिवरात्रीच्या निमित्ताने झाला. या अभूतपूर्व ४५ दिवसांच्या कार्यक्रमाची जगभरात चर्चा होत आहे. यापूर्वी जगभरातील कोणीही कोठेही कधीही श्रद्धेचा इतका महासागर पाहिलेला नाही. ४५ दिवसांत ६६ कोटी ३० लाखांहून अधिक भाविकांनी संगमात स्नान केले. दररोज १.२५ कोटींहून अधिक भाविक पवित्र स्नान करत होते. या महाकुंभ मेळ्याला ५० लाखांहून अधिक परदेशी भाविक आले. तसेच, ७० हून अधिक देशांतील लोक प्रयागराजला पोहोचले.

तथापी, अमेरिकेच्या लोकसंख्येच्या दुप्पट आणि जगभरातील १०० हून अधिक देशांच्या एकूण लोकसंख्येपेक्षा जास्त लोकांनी प्रयागराजला भेट दिली.

**हाताने रंगवण्याचा नवा विक्रम** – सनातन संस्कृतीच्या दिव्य तेजाने उजळलेल्या या भव्य कार्यक्रमाने एकाच वेळी नदी स्वच्छ करणाऱ्या जास्तीत जास्त लोकांचा, एकाच ठिकाणी एकाच वेळी स्वच्छता करणाऱ्या कामगारांचा आणि ८ तासांत हाताने रंगवणाऱ्या जास्तीत जास्त लोकांचा विक्रम 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंदवून एक नवा इतिहास रचला गेला. महाकुंभात हस्तकला क्षेत्रातही एक नवा विक्रम प्रस्थापित झाला. या रेकॉर्डमध्ये एकूण १०,१०२ लोकांनी एकत्रितपणे रंगकाम केले होते. यापूर्वीचा रेकॉर्ड ७,६६० जणांचा होता.

**झाडू लावण्याचा रेकॉर्ड**

या स्वच्छ मोहिमेत एक नवीन टप्पाही नोंदवण्यात आला १९ हजार लोकांनी एकत्र झाडू लावून स्वच्छता मोहीम यशस्वीपणे पार पाडली. यापूर्वी हा विक्रम १० हजार लोकांनी केला होता.

हे अभियान समाजात स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करतेच, शिवाय सामूहिक प्रयत्नांची शक्तीदेखील दर्शवते. या नोंदींसाठी प्रमाणपत्रे आज संबंधित अधिकाऱ्यांनी प्रदान केली आणि या कामगिरीबद्दल सर्व सहभागींचे अभिनंदन करण्यात आले. हे सर्व उपक्रम समाजाला स्वच्छतेचे आणि सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व समजावून देण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे सिद्ध होत आहे.

दरम्यान, मौनी अमावस्येला झालेल्या चेंगराचेंगरीमुळे महाकुंभाची प्रतिमा थोडीशी मलिन झाली; परंतु या घटनेचा भाविकांच्या श्रद्धेवर फारसा परिणाम झाला नाही.

महाकुंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून ते अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, स्टार्स आणि क्रीडा आणि उद्योग जगतातील व्यक्तिमत्त्वांपर्यंत, सर्वांनी त्रिवेणी संगमात स्नान केले. तथापी, अनेकांनी योदी सरकारने केलेल्या व्यवस्थेचे कौतुक केले.

### गंगा स्वच्छतेचा नवा विक्रम

महाकुंभात गंगा स्वच्छता मोहिमेअंतर्गत एक नवा विक्रम प्रस्थापित झाला. ३६० लोकांच्या टीमने चार वेगवेगळ्या ठिकाणी स्वच्छता करण्यासाठी एकत्र काम केले आणि ही एक नवीन कामगिरी बनली आहे. पूर्वी अशा स्वच्छता मोहिमांमध्ये कमी संख्येने लोक सहभागी होते; परंतु आता ही संख्या ३६० पर्यंत पोहोचली आहे.

# 'एआय'च्या सहाय्याने सुप्रशासन राबवावे - मुख्यमंत्री

मुंबई : लोकाभिमुखता, गतिशीलता आणि पारदर्शकता या सुप्रशासनामध्ये (ऋेव सेंशीपरपलश) अतिशय म हत्त्वाच्या बाबी आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) येत्या काळात सर्वच क्षेत्रात मोठा बदल घडून येणार असून सुप्रशासन राबविताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब करावा, असे निर्दे श मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे १०० दिवसांच्या आराखड्यानुसार आतापर्यंत उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

राज्य शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, त्या योजनांचा सर्वसामान्यांना सुलभतेने लाभ मिळावा या उद्देशाने प्रत्येक विभागाने १०० दिवसात करावयाच्या कामांचा कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ९ डिसेंबर २०२४ रोजीच्या बैठकीत दिले होते. या आराखड्यानुसार होत असलेल्या कामांचा मुख्यमंत्र्यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, क्षेत्रीय अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. तर ६,८५४ अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते. ऑनलाईन बैठकीला सर्व स्तरातील इतके अधिकारी उपस्थित असण्याचा हा एक विक्रमच होय. तालुका स्तरापर्यंतच्या अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मंत्रालयापासून गाव पातळीपर्यंत विविध कार्यालयांम धील सर्व अधिकाऱ्यांनी नागरिकांना सेवा सुविधांचा लाभ सुलभतेने मिळवून देण्यासाठी तसेच त्यांचे समाधान होईल यासाठी प्रयत्न करावेत. सुप्रशासन असेल तेथे गुंतवणूक वाढते. महाराष्ट्र हे यादृष्टीने अग्रेसर राज्य असून यामध्ये आणखी वाढ होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आराखड्यानुसार शंभर दिवस पूर्ण झाल्यानंतर विभाग आणि जिल्हा पातळीवर या कामांचे समीक्षण आणि मूल्यमापन केले जाईल. त्या आधारावर उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागांना १ मे रोजी सन्मानित केले जाईल. त्याचबरोबर ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळवणाऱ्या विभागांची नकारात्मक दखल घेतली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

शंभर दिवसांच्या आराखड्यानुसार प्रभावी कार्यवाही करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ, नागरिकांचे सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयी व सुविधा, गुंतवणूक प्रसार, कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, ई ऑफिसचा वापर, नाविन्यपूर्ण उपक्रम, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी आदी मुद्दे ठरवून देण्यात आले होते.

उत्कृष्ट कार्य केलेले १५ विभाग आणि कार्यालये

१) पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर २) पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा ३) विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, छत्रपती संभाजी नगर ४) बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई ५) गृह विभाग मंत्रालय ६) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ७) ठाणे म हानगरपालिका ८) जिल्हा परिषद कार्यालय, धुळे ९) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर १०) जिल्हा परिषद कार्यालय, चंद्रपूर ११) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव १२) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे १३) आदिवासी आयुक्त कार्यालय १४) वैद्यकीय शिक्षण आयुक्त कार्यालय आणि १५) मृद व जलसंधारण कार्यालय, मंत्रालय यांचा समावेश आहे.

लक्षणीय कामगिरी करणाऱ्या १५ अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

पालघर पोलिस अधीक्षक : बाळासाहेब पाटील

सातारा पोलिस अधीक्षक : समीर अस्लाम शेख

छत्रपती संभाजीनगर आयजी : वीरेंद्र मिश्रा

मुंबई पोलिस आयुक्त : विवेक फणसाळकर

गृह, अतिरिक्त मुख्य सचिव : इकबालसिंह चहल

आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका : शेखर सिंग

आयुक्त, ठाणे महापालिका : सौरभ राव

मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे, जिप: विशाल नारवाडे

मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर, जिप: विवेक जॉन्सन

जिल्हाधिकारी, नागपूर : विपीन इटनकर

जिल्हाधिकारी, जळगाव : आयुष प्रसाद

विभागीय आयुक्त, पुणे : डॉ. पुलकुंडवार

आदिवासी आयुक्त : लिना बनसोडे

आयुक्त वैद्यकीय शिक्षण : राजीव निवतकर

सचिव, मृद व जलसंधारण : गणेश पाटील

## प्रेरणादायी कथा

# ‘जगातील सर्वोत्तम आई’चा पुरस्कार मिळालेला भारतीय पुरुष!

पुण्यातील आदित्य तिवारी, एक सॉफ्टवेअर इंजिनिअर, ज्यांनी डाऊन सिंड्रोम असलेल्या २२ महिन्यांच्या अवनिशला २०१६ मध्ये दत्तक घेतलं. सिंगल पॅरेंट म्हणून अपंगत्व असलेल्या मुलाला दत्तक घेणं सहज शक्य नव्हतं. कायदेशीर अडथळे, सामाजिक विरोध आणि कुटुंबाचा संमिश्र प्रतिसाद यांवर मात करत त्यांनी हा लढा जिंकला.



अवनिशसाठी त्यांनी आपल्या नोकरीचा त्याग केला आणि विशेष मुलांच्या पालकांसाठी मार्गदर्शन, समुपदेशन सुरू केलं. त्यांना लक्षात आलं की भारतात बौद्धिक अपंगत्वासाठी स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यांनी सरकारकडे याचिका दाखल केली आणि अखेर आज अशा मुलांसाठी स्वतंत्र विभाग अस्तित्वात आहे. आदित्य तिवारी यांची आत्मीयता आणि समर्पण लक्षात घेऊन ’वेमपावर’ या ‘जागतिक महिला दिन’ विशेष सोहळ्यात त्यांना ‘बेस्ट मॉम ऑफ द वर्ल्ड’ या पुरस्काराने गौरविण्यात आलं आहे. आज, अवनिश पाच वर्षांचा झाला आहे आणि त्याच्या प्रगतीने आदित्य आणि त्यांच्या कुटुंबाला आनंदित केलं आहे. अवनिशने स्वतःच्या पायावर उभं राहून चालायला सुरुवात केली आहे आणि शाळेत इतर मुलांसोबत खेळतो. आदित्य आणि अवनिश यांनी मिळून २२ राज्यांचा प्रवास केला आहे, ४०० हून अधिक कार्यक्रम घेतले आहेत आणि हजारो पालकांना आधार दिला आहे. संयुक्त राष्ट्राने देखील त्यांच्या कार्याची दखल घेतली आणि त्यांना विशेष संमेलनात आमंत्रित केलं. आदित्य तिवारी यांची ही प्रेरणादायी कथा आपल्याला दाखवते की, मातृत्व ही भावना केवळ स्त्री, पुरुषांच्या मर्यादांमध्ये नाही, तर ती कोणत्याही व्यक्तीच्या हृदयात असू शकते. एका प्रशासकीय अधिकाऱ्याच्या फेसबुक वॉलवरील पोस्ट आमच्या वाचकांकरीता प्रसिद्ध करीत आहोत.

# प्रशासकीय कामकाजातून मराठी भाषा संवर्धनाचे काम करावे- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेचा प्रशासकीय कामकाजात पूर्ण वापर करून मराठी भाषा संवर्धनाचे काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. नागेश अंकुश यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, उमाकांत पारधी,डॉ.सुचिता शिंदे उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

शासकीय कामकाज करत असताना मराठी भाषेचा वापर आणि उपयोग योग्य प्रकारे करून व्याकरण ,शुद्धलेखन, प्रमाणभाषा, लोकांना समजेल अशा प्रकारचा पत्र व्यवहार प्रशासकीय कामकाजात करण्यात बाबतच्या सूचना जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी कार्यक्रमात दिल्या.

डॉ. नागेश अंकुश यांनी प्रशासकीय कामकाजातील मराठी भाषा, ए आय म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, प्रमाण लेखन, लेखन विषयक नियम, शुद्धलेखन व विविध शब्दाचा, शब्दकोशाचा वापर शासकीय कामकाज करत असताना करावा. प्रमाणभाषा म्हणून कोणकोणत्या नियमाचा अवलंब करणे आवश्यक आहे याविषयीचे मार्गदर्शन केले.

शब्दाची योग्य पद्धतीने मांडणी , शब्द आणि वाक्याचा होणारा अर्थबोध हा प्रमाण भाषेमध्ये असेल तर शासकीय कामकाज सुलभ होते ,याचे महत्त्व विशद करत असताना विविध उदाहरणाचे दाखले त्यांनी दिले.विविध शब्दांचा वापर वाक्यामध्ये करत असताना अनुस्वार, उकार ,वेलांटी, ऱ्हस्व, दीर्घ, शब्द, अव्यये, व्याकरण, संस्कृतमधून आलेले शब्द आणि तद्भव शब्दांविषयीचाही ऊहापोह या मार्गदर्शनपर व्याख्यांमध्ये उदाहरणासह सांगितला.

# श्री.१००८ वासुपुज्य दिगंबर जैन अतिशय क्षेत्र बाभुळगांव येथे वार्षिक यात्रा भक्तिभावाने संपन्न

## भगवंतांचा महामस्तकाभिषेकाने यात्रेची सांगता



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री १००८ वासुपुज्य दिगंबर जैन अतिशय क्षेत्र बाभुळगांव पिराचे. औरंगाबाद येथे २६फ ेब्रुवारी बुधवार रोजी सालाबादा प्रमाणे वार्षिक यात्रा महोत्सवाचे आयोजन सिध्दांत चक्रवर्ती आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या सानिध्यात करण्यात आले होते. तसेच यावेळी भगवान वासुपुज्य यांचा जन्म कल्याण महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सर्व प्रथम सकाळी ९ वाजता वासुपुज्य भगवानाच्या फोटोची भव्य शोभायात्रा बाभुळगांव गावातुन काढण्यात आली. या शोभायात्रेत महिलांनी केशरी वस्त्र तर पुरफषांनी सफेद वस्त्र परिधान केले होते. ठिकठिकाणी मिरवणुकीवर भाविकांकडुन व गावक-यांकडुन पुष्पवृष्टी करण्यात येत होती. तसेच ठिकठिकाणी रांगोळयाही काढण्यात आल्या होत्या. तदनंतर पुनमचंद कलावती पाटणी परिवार यांच्या वतीने धर्म ध्वजारोहन करफन यात्रेस सुरफवात करण्यात आली. आचार्य हेमसागरजी महाराज यांचे पादपक्षालन करण्याचा मान वर्धमान रिखबचंद पाटणी परिवार लोणीवाला यांना मिळाला. यावेळी सुत्रसंचालन राजाबाजार जैन मंदिराचे माजी सचिव अशोक अजमेरा व प्रकाश पहाडे यानी केले. यात्रेमध्ये भगवंताचा इंद्र-इंद्राणी बनण्याचे सौभाग्य सौ. रिना नितीनकुमार अजमेरा परिवार यांना मिळाला. तर शांतीमंत्राचा मान महेंद्रकुमार निलेशकुमार सागरकुमार पांडे परिवार श्रीरामपुरा वाला यांना मिळाला. तसेच जलअभिषेकाचा मान श्रध्दा प्रितम पांडे, इक्शुरसचा मान ताराचंद माणिकचंद अजमेरा परिवार, आम्ररस शांतीलाल गुलाबचंद पहाडे, चिकुरस यश संतोष शिखरचंद पाटणी, अनाररस अशोक आशिष स्वप्नील छाबडा, मोसंबीरस सुनिल प्रविण गंगवाल, दुध अभिषेक सोनाली नितीनकुमार चुडीवाल, दहि अभिषेक नितीन पलाश चुडीवाल, घी अभिषेक स्वप्नील दिलीप पांडे, सफरचंद रस पदमादेवी ठोले, सर्व औषधी सो अर्चना रविंद्रकुमार कासलीवाल परिवार नाशिक, चतुर्थ कळस सौ.शर्मिला मनोज कासलीवाल, सुगंधीत कलश अभिषेक तिलोकचंद चुडीवाल,पुष्पवृष्टी महेंद्र निलेश सागर पांडे परिवार, मंगल आरती पांडे परिवाराच्या मुली परिवार पुर्ण कळस शोभा अशोक कासलीवाल आदिंच्या हस्ते भगवंतांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. भगवंताचा पाळणा हलविण्याचा मान श्रीमती.कुसुमबाई रमेशचंद अजमेरा परिवार यांना मिळाला. अर्चना फळ आसराम दुलीचंदजी अजमेरा परिवाराच्या मुली आदिंच्या वतीने भगवंतांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी आचार्य हेमसागरजी म हाराज यांना शास्त्र भेट करण्याचा मान फुलचंदजी अजमेरा परविाराच्या नाती यांना मिळाला. यावेळी भगवान वासुपुज्य यांच्या विषयी महती उपस्थितांना सांगीतली. यावेळी श्री.क्षेत्र कचनेरचे विश्वस्थ सुभाष बोहरा, कार्यकारणी सदस्य शांतीलाल पहाडे, राजेंद्र कासलीवाल, अशोक अजमेरा आदींची उपस्थिती होती. उपस्थितांना महाप्रसाद देण्याचा मान महेंद्र निलेश सागर पांडे परिवार श्रीरामपुरवाला यांना मिळाला. यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी दीपचंद अजमेरा शांतीलाल झांझरी प्रकाश अजमेरा दीलीप अजमेरा जितेद्र अजमेरा पवन, झाझंरी भरत, अजमेरा पारस, झांझरी सतीश, अजमेरा रितीक, अजमेरा आंनद, अजमेरा पारस, अजमेरा सुरेश, अजमेरा मनोज अजमेरा यांनी केले आहे,अशी माहीती नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यानी दिली.

# वेरूळ ग्रामपंचायतीतर्फे महाशिवरात्रीचा पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आले कुस्ती आखाडा रंगले

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तालुक्यातील वेरूळ येथे म हाशिवरात्रीचे निमित्ताने गुरुवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे दरवर्षी प्रमाणे. ग्रामपंचायत मार्फत कुस्त्यांचा आखाड्याच्या आयोजन करण्यात आले होते या आखाड्यात. जिल्हा भरातील,मल्ल पैलवान. स्पर्धा.मध्ये सहभाग झाले होते. वेरूळ येथे महाशिवरात्रीचे निमित्ताने यात्राचे दुसऱ्या दिवशी.वेरूळ ग्रामपंचायत तर्फे. कुस्त्यांची आखाड्याच्या आयोजन.



वेरूळ या ग्रामीण भागात शेकडो वर्षांची परंपरा आज ही कायम आहे. कुस्त्यांची दंगल वेरूळ सारखे या गावात सुरू आहे.. वेरूळ ग्रामपंचायत तर्फ महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद शाळाचे मैदानावर.कुस्तीच्या आखाड्याच्या आयोजन करण्यात आले होते.या आखाड्यात.जिल्हे भरातील ग्रामीण भागातील शेकडो पहिलवान. सहभाग झाले होते.वेरूळ गाव म्हणजे. जगाचे नकाशे वर.गावाचा नाव हा आजी परंपरा आहे.

वेरूळ येथील यात्रा उत्सव नंतर दुसऱ्या दिवशी दोन सत्रात लहान मोठ्या कुस्त्या होतात. २० रुपये पासून ते.११ अकराशे. रुपये पर्यत निकाली कुस्ती होतात.येथील कुस्तीला अनेक वर्षांची परंपरा आहे.जिल्हा भरातील नामवंत मल्ल पैलवान मंडळी या मैदानात येऊन कुस्ती खेळल्या आहेत अनेक पैलवान या आखाडयाता दरवर्षी येऊन कुस्ती खेळत. दरवर्षी उतम नियोजन करून कुस्ती स्पर्धा भरवते.वेरुळ येथील ग्रामपंचायत मार्फत. कुस्ती पंचकमिटी सापन करून. अध्यक्ष निवडले जाते. अध्यक्ष नामदेव बकाल.उपाध्यक्ष हंसराज चव्हाण. यावेळी माजी सरपंच प्रकाश पाटील,चंदू . उपसरपंच विजय राठोड. विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन मूलचंद चव्हाण.जयलाल सुलाने. माजी सरपंच साहेबसिंग गुमलाडू

ग्रामसेवक चंद्रकांत हिंगोले,ग्राम पंचायत कर्मचारी शेख नईम राजू आडे,माजी ग्रामपंचायत सदस्य सूर्यकांत सन्नानसे. वेरूळ येथील सामाजिक कार्यकर्ते दिनेश श्रीसुंदर.शौकत खलील हुसेन. पोलीस पाटील रमेश ढिवरे यांचे सह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. वेरूळ ग्रामपंचायततर्फे महाशिव रात्रीचा पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आले.

# मराठीचा अभिमान बाळगा; म्हणत उद्धव ठाकरेंचं खुमासदार भाषण, एकनाथ शिंदेंना म्हणाले, गद्दारीचा शिक्का..

**पान १ वरून**

समाजाने काय केलं पाहिजे हे शिकवलं. बाळासाहेबांचे विचार सांगणारे दुबईला जाऊन क्रिकेटची मॅच बघणारे लोक आम्हाला सांगत आहेत. हिंदुस्थान पाकिस्तान मॅच कुठेही असली तरीही आम्ही जाऊ मॅच पाहू. सगळे तिकडे जाऊन मॅच बघत आहात आणि परत येऊन आम्हाला बाळासाहेबांचे विचार शिकवता. मंत्रिपद मिळालं नाही म्हणून गावी जाऊन बसता मग मराठी रंगभूमिचं दालन का होऊ देत नाही? आम्ही उपऱ्यांना घुसू देणार नाही असा इशारा उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना दिला.

**वाचून बोलायची सवय नाही नाहीतर मी**: कुसुमाग्रजांच्या दोन ओळी लिहून आणल्या आहेत. वाचून बोलायची सवय नाही कारण तसं बोलायची सवय असती तर कदाचित मी.. ते जाऊदे. मराठी शाळा बंद पडत आहेत, दुर्दैव आहे. माझीही
मुलंही इंग्रजी शाळेत शिकली आहेत. तेव्हा काहूर उठलं होतं मराठी मराठी करणाऱ्यांची मुलं इंग्रजी शाळेत जातात. पण आज तुम्हाला सांगतो आदित्य आणि तेजसला उभं करा बघा ते कसं मराठी बोलतात. याचं कारण घर आणि घरातले संस्कार आहेत. आदित्यला इंग्रजी शाळेत प्रवेश घेण्यासाठी जात होतो तेव्हा मला आणि रश्मीला बाळासाहेबांनी सांगितलं होतं की इंग्रजी शाळेत, घरात मराठी. तसंच डॅडी वगैरे नाही घरात आई आणि बाबा असंच म्हणायचं. आम्ही मराठी शाळेत शिकलो. शिवसेना प्रमुखांना आणि प्रबोधनकारांना तर शाळेतलं शिक्षणच पूर्ण करता आलं नाही. सातवीतच प्रबोधनकारांना शाळा सोडावी लागली होती. बाळासाहेबांनाही फी भरता आली नाही म्हणून शाळेतून काढलं होतं.

**मी मुख्यमंत्री असताना राज्यात मराठी भाषेची सक्ती केली होती-ठाकरे**

मी मुख्यमंत्री असताना राज्यात मराठी भाषेची सक्ती केली होती. महाराष्ट्रात आम्ही मराठी बोलणार. दुकानावर मराठी पाट्या हव्या हा कायदा मी मुख्यमंत्री असताना केला. पण सरकारच्या निर्णयाविरोधात एक कुणीतरी उपरा कोर्टात गेला ही हिमंत होतेच कशी? आम्ही हिंदू आहोत पण मराठीही आहोत. हम करे सो कायदा ते या दोघांचं चाललं आहे. मी गुजराती सम ाजाविरोधात नाही. पण त्या दोघांना मराठी आणि महाराष्ट्र खतम करायचा आहे. मुंबई ओरबाडायची आहे. उद्योगधंदे बाहेर न्यायचा आहे. मराठी म ाणसाच्या हातात भिकेचा कटोरा द्यायचा. पण तो कटोरा तोंडावर मारुन तुमच्यासमोर मराठी माणूस उभा राहिल असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. कुसुमाग्रज म्हणाले आहेत की ङ्गपरभाषेतही व्हा पारंगत, ज्ञानसाधना करा तरी, माय मराठी मरते इकडे, परकीचे पद चेपू नका, भाषा मरता देशही मरतो, संस्कृतीचाही दिवा विझे. गुलाम भाषिक होऊन आपल्या प्रगतीचे शीर कापू नका.ङ्ख आपल्या भाषेत काही कमतरता नाही. अभिजात भाषेचा दर्जा द्यायला किती काचकूच केली होती. तुम्ही कोण अभिजात भाषेचा दर्जा देणारे? छत्रपती शिवाजी महाराजांची भाषा मराठी होती. ते नसते तर तुम्हाला दिल्ली दिसली नसती असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

इतिहासात असं म्हटलं जायचं की मराठ्यांच्या घोड्यांच्या टापांच्या आवाजाने दिल्ली हादरायची. आत्ता जे दिल्लीत जातात त्यांची काय टाप आहे का? त्या टापांचा आवाज वेगळा आणि यांची टाप वेगळी, असाही टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.
• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003
• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**